**पिण्याच्या पाण्याच्या नियमित योजना तसेच पाणी टंचाई निवारणार्थ घेण्यात येणा-या पाणी पुरवठा योजनांची वीज बिले , पाणीपट्टीची बिले इ. वरील खर्च " ग्रामपंचायत पाणी पुरवठा निधी " तून भागविण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन,**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,**
**शासन परिपत्रक क्रमांक टंचाई १००२/प्र.क्र.२२१/पापु-१४**
**मंत्रालय , मुंबई ४०० ०३२**
**दिनांक:- ७ जून, २००३.**

**परिपत्रक :-**

ग्रामीण भागात पिण्याचे पाणी पुरवठयासाठी नियमित कार्यक्रमांतर्गत विविध योजना तसेच पाणी टंचाई कालावधीत टंचाई निवारणार्थ घेण्यात येणा-या विविध उपाययोजना घेण्यात येतात. याप्रमाणे घेण्यात येणा-या योजना/उपाययोजना चालविण्यासाठी व योजनांची वीज बिले, आरक्षित केलेल्या पाण्याची बिले, पाणी शुध्दीकरणासाठी आवश्यक असलेल्या टी.सी. एल. खरेदीवरील खर्च भागविण्यासाठी शासनाकडे अनुदान मागविण्याबाबत क्षेत्रिय अधिका-यांकडून मागणी करण्यात येते. पाणी पुरवठा योजना तयार झाल्यानंतर ती चालविण्यासाठी जबाबदारी संबंधित स्थानिक संस्था म्हणजेच जिल्हा परिषद किंवा ग्रामपंचायतीची असते. यासाठी पुरेशा प्रमाणात पाणीपट्टी लावून व तिची नेटाने वसूली करुन त्यातून खर्च भागविणे अपेक्षित आहे. त्याचप्रमाणे, यासाठी जिल्हा स्तरावर स्थापन करण्यात आलेल्या **" जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधी "** तसेच ग्रामपंचायत स्तरावर स्थापन करण्यात आलेल्या **" ग्रामपंचायत पाणी पुरवठा निधी "** तून खर्च करण्याबाबत तरतूद आहे. मात्र असे असूनदेखील शासनाकडून निधीची मागणी केली जाते व योजनाची देखभाल व दुरुस्ती योग्य प्रकारे होत नसल्याचे दिसून येते. ग्रामपंचायत स्तरावर असलेल्या ग्रामपंचायत पाणीपुरवठा निधीचे योग्य प्रकारे व्यवस्थापन करुन त्यातून हा खर्च भागविणे आवश्यक आहे.

२. यासंदर्भात असे नमूद करण्यात येते की, दिनांक २ जानेवारी, १९९७ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र. ५ अन्वये मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मध्ये सुधारणा करण्यात आली असून कलम ५७ नुसार प्रत्येक ग्रामपंचायत स्तरावर **" ग्राम पाणी पुरवठा निधी "** स्थापन करण्यात आलेला आहे. तसेच, या निधीच्या संदर्भात ग्राम विकास व जलसंधारण विभागाच्या दिनांक २२ सप्टेंबर, १९९७ च्या अधिसूचनेन्वये नियम तयार करण्यात

आले असून सदर नियमानुसार " **ग्रामपंचायत पाणी पुरवठा निधी** " मध्ये खालील रकमा जमा होणे आवश्यक आहे:-

(१) ग्रामपंचायत पाणी पुरवठा निधी स्थापन होण्यापूर्वी ग्राम सेवायोजन निधीमध्ये जमा असलेली रक्कम

(२) ग्रामपंचायतीला मिळणा-या जमीन महसूल अनुदानातील ३५% रक्कम

(३) सर्वसाधारण आणि विशेष दराने जमा होणारी पिण्याच्या पाण्याच्या योजनांवरील पाणीपट्टीची रक्कम

(४)घरगुती आणि अन्य वापरासाठी पुरविण्यात आलेल्या खाजगी नळ जोडणीव्दारा जमा झालेली ठेव रक्कम

वरीलप्रमाणे ग्रामपंचायत पाणी पुरवठा निधीमध्ये जमा होणारी रक्कम ही पूर्णतः घरगुती व जनावरांसाठी पाणी वापरासाठी पुरविण्यात येणा-या पाणी पुरवठयासाठीच खर्च करण्याची तरतूद नियम ३ (२) व नियम ७ मध्ये करण्यात आलेली आहे. सदर बाब लक्षात घेता, ग्रामपंचायत क्षेत्रामध्ये असणा-या नियमित पाणी पुरवठा तसेच तातडीच्या पाणी पुरवठा कार्यक्रमांअतंर्गत घेतलेल्या उपाययोजनांवरील खर्च " **ग्रामपंचायत पाणी पुरवठा निधी** " मधून भागविण्याची दक्षता घेण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

**(रु. न. देशमुख)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन,**

प्रत:-
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी (मुंबई व बृहन्मुंबई जिल्हा वगळून)
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई (प्रशासन /तांत्रिक),
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पूणे,
मुख्य अभियंता , महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी (सर्व)
खाजगी सचिव (सर्व मंत्री/राज्यमंत्री),
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व अधिकारी , पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
पापु-१४ संग्रहासाठी.-